## महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी अवलंबित विश्वस्त संस्था

४ था मजला, प्रकाशगड, बांदा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.


जा.क्र. : का.औ.सं.वि./मानिभ/ 16853 दिनांक : 4/4/2007

## परिपत्रक

विषय :- मृत कर्मचा-यांच्या अवलंबिताना देण्यात येणा-या 'मासिक निर्वाह भत्त्या'चे धनादेशाबाबत.

**************

खाली सही करणा-याच्या निदर्शनास असे दिसून आले आहे की, क्षेत्रीय कार्यालये वरील विषयासंबंधी फारसे गंभीर असल्याचे दिसत नाही कारण मृत कर्मचा-यांच्या वारसांना देण्यात आलेले धनादेश इतस्ततः जातात तसेच धनादेश अवलंबिताना वेळेवर दिले जात नाहीत. अवलंबितसुध्दा काही वेळेस धनादेश त्यांच्या बँकेमध्ये वेळेवर व मुदतीमध्ये जमा करीत नसतात. धनादेश खराब किंवा फाटलेलेही असतात. धनादेश म्हणजे चलन आहे व चलनाची आपण जशी काळजी घेतो तशीच प्रत्येकाने धनादेशाची काळजी घ्यावयास हवी. परंतु तसे होत नाही.

याशिवाय क्षेत्रीय कार्यालये अवलंबितांना नवीन धनादेश देण्याबाबत अथवा त्याची मुदत बदलून देण्यासाठी विश्वस्त संस्थेकडे १ ते २ वर्षांनी विनंती करीत असतात शिवाय काही वेळेस संबंधित अवलंबित अथवा विभागीय / मंडळ कार्यालये विश्वस्त संस्थेकडे परस्पर पत्रव्यवहार करीत असतात. संबंधित परिमंडलाच्या शिफारशी शिवाय विश्वस्त संस्था काही कार्यवाही करु शकत नसल्यामुळे त्यांची शिफारस घेण्यासाठी विश्वस्त संस्थेस परिमंडलाशी पुनःपत्रव्यवहार करावा लागतो हेही सुसंगत वाटत नाही.

यासंबंधित विश्वस्त संस्था खालीलप्रमाणे सूचना देत आहे.

१) प्रत्येक महिन्यामध्ये देण्यात येणा-या धनादेशाचे वितरण ताबडतोब संबंधित अवलंबितांना करण्यात यावे.

२) तो धनादेश बँकेमध्ये ताबडतोब व वेळेवर भरण्याची जबाबदारी संबंधीत अवलंबितांची आहे.

३) अवलंबिताने त्यांना देण्यात आलेला धनादेश मुदतीमध्ये बँकेमध्ये भरला नसल्यास ती त्या अवलंबिताची जबाबदारी असल्यामुळे त्यांना नवीन धनादेश देण्याबाबत शिफारस करण्यात येऊ नये. काही विशेष कारणास्तव धनादेश भरला गेला नसेल अथवा काही प्रशासकीय कारणानुसार तसे झाले तरच नवीन धनादेश देण्याबाबत विश्वस्त संस्थेला वेळेवर कळवावे.

४) तसेच जर अवलंबिताकडून त्यांना देण्यात आलेला धनादेश त्यांच्याकडून खराब, फाटला अथवा गहाळ झाल्यास त्यांना नवीन धनादेश देण्याबाबत आग्रह धरु नये. कारण अशा व्यवहारासाठी बँक संस्थेला रु. २००/- ते [illegible] बँक आकारणी करीत असते व विश्वस्त संस्थेवर त्यासाठी विनाकारण आर्थिक भार पडतो.

५) काही वारस परस्पर बँकेला व विश्वस्त संस्थेस नवीन धनादेश देण्याबाबत पत्रव्यवहार करीत असतात हे योग्य नाही तरी परिमंडलानी परिपत्रक काढून त्यांनी बँकेस अथवा विश्वस्त संस्थेकडे परस्पर पत्रव्यवहार करु नये अशा सूचना त्यांना देण्यात याव्यात.

विश्वस्त संस्था याबाबतीत आपल्याकडून सहकार्याची अपेक्षा करीत आहे म्हणून वर नमूद केलेल्या बाबींचा काटेकोरपणे पालन करण्यात यावे ही विनंती

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
व
विश्वस्त संस्थेचे सदस्य सचिव

प्रेषण यादीप्रमाणे (सर्व कंपन्यामधील) मुख्य अभियंता / मुख्य महाव्यवस्थापक व तत्सम अधिकारी यांना रवाना.